MHNG170003062025

**आदेश निशाणी ८ खाली**
(पारीत दिनांक १०.०३.२०२६)

**१.** अर्जदाराने सदरचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ (सदर कायद्यास या पुढे संक्षिप्तमध्ये ''**कौटुंबिक हिंसाचार कायदा, २००५**'' असे संबोधण्यात येईल) च्या कलम १२ अन्वये दाखल केलेला आहे. सदर अर्जामध्ये अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचार कायदा, २००५ च्या कलम २३ अन्वये अर्जाचा निकाल लागेपर्यंत अंतरीम पोटगी मिळणेबाबत मागणी केली आहे.

**२.** अर्जदाराचे असे कथन की, तिचा गैरअर्जदार रमेश शंकर लेदाडे याच्यासोबत दि.२०.०६.२०११ रोजी मौजा सिरसी, ता.उमरेड, जि.नागपूर येथे विवाह झाला. सदर लग्न संबंधातून त्यांना दोन मुले आहेत. विवाहानंतर अर्जदार ही गैरअर्जदाराकडे नांदण्यास गेली. सदर विवाहापूर्वी गैरअर्जदाराने स्वतःची ओळख तो पुणे येथे एका टाईल्स कंपनीमध्ये मॅनेजर असल्याचे अर्जदार व तिच्या परीवाराला सांगितले होते व काही दिवसांनी गैरअर्जदार हा महाल गावाजवळ टाईल्सची कंपनी टाकणार आहे असे देखील सांगितले होते. त्यावेळी लग्नामध्ये गैरअर्जदाराने अर्जदाराच्या परिवाराकडून रक्कम रु.५०,०००/- जबरदस्तीने मागितले व गैरअर्जदाराच्या मागणीनुसार दहा ग्राम सोन्याचा गोप व पाच ग्राम सोन्याची अंगठी दिली. तसेच अर्जदाराल लग्नामध्ये पंचवीस ग्राम सोन्याची पोत दिली होती. लग्नाच्या आठ दिवसांनंतर गैरअर्जदार अर्जदाराला घेवून पुणे येथे गेला. तेथे आठ ते दहा दिवस गैरअर्जदार कामावर न गेल्याने अर्जदाराने त्याला नोकरीबाबत विचारले असता त्याने नोकरी सोडल्याचे सांगितले. त्यामुळे अर्जदाराला धक्का बसला. त्यानंतर गैरअर्जदार हा पुणे येथे दैनंदिन गरजांसाठी अर्जदाराला पैसे देत नव्हता. त्यानंतर तो कुठलेही काम करीत नसल्यामुळे अर्जदारासह सिरसी या गावी

आला. त्यानंतर तो सिरसी या गावी अर्जदाराला सोडून बाहेरगाव कामाला जात होता. त्याचवेळी पहिला मुलगा मंथन याच्या प्रसुतीच्यावेळी गैरअर्जदाराने कुठलाही खर्च दिला नाही. तो त्याला मिळणारा सर्व पगार दारुमध्ये उडवीत होता. तसेच, अर्जदाराला शिवीगाळ व मारहाण करीत होता. गैरअर्जदाराची आई अर्जदाराला अपशगुनी आहे, जावयाला खाल्ले असे टोमणे मारत होती. गैरअर्जदार हा अर्जदाराला दारु पिवून मारहाण करीत होता तसेच, तिच्या चारित्र्यावर संशय घेवून तिला अश्लील भाषेत शिवीगाळ करीत होता. गैरअर्जदाराला दारुच्या व्यसनामुळे पगाराचे पैसे पुरत नसल्यामुळे अर्जदाराचे दागिणे विकून टाकले. तसेच, त्यावेळी गैरअर्जदाराच्या आईने अर्जदारावर चोरीचा आरोप केला. दि.२१.११.२०२४ रोजी गैरअर्जदाराने अर्जदाराला खूप मारहाण केल्याने ती माहेरी गेली. त्यानंतर अर्जदाराच्या घरच्यांनी समजूत काढल्याने ती पुन्हा नांदण्यास गेली असता दि.०१.१२.२०२४ रोजी तिला गैरअर्जदाराने मारहाण केली व गळ्यावर पावशी ठेवून जिवे मारण्याची धमकी दिली. अर्जदाराचे असे म्हणणे की, गैरअर्जदार हा उमरेड येथे एका कंपनीमध्ये सिक्योरिटी गार्ड म्हणून काम करतो. त्यामधून त्याला पगार रु.२०,०००/- प्रतिमाह कमावितो. तसेच गैरअर्जदार हा दुध-दह्याचा व्यवसाय करतो त्यामधून रु.३०,०००/- प्रतिमाह कमावितो, तसेच ठेक्याने शेती करतो व त्यामधून त्याला वार्षिक रु.३,००,०००/- मिळतात. गैरअर्जदाराविरुद्ध सदरचा अर्ज दाखल केला व अर्जदाराने श्रीधन परत मिळणेकरिता व दरमहा दहा हजार रुपये अंतरीम पोटगी मिळणेकरिता मागणी केली होती.

**३.** गैरअर्जदाराने त्याचे लेखी बयान व सदर अर्जास उत्तर नि.क्र.९ वर दाखल केला. त्याने अर्जदारासोबत लग्नसंबंध मान्य केले. तसेच तो पुणे येथे एका टाईल्स कंपनीमध्ये मॅनेजर होता, परंतु, अर्जदाराचा इतर सर्व मजकूर नाकारला. त्याच्या विशेष कथनामध्ये त्याने असे म्हणणे मांडले की, त्याचे व अर्जदाराचे लग्न दि.२०.०६.२०११ रोजी श्री संत रंगनाथ बाबा येथे जाती रिवाजाप्रमाणे झाला व विवाहाचा संपूर्ण खर्च गैरअर्जदार यांनी केला. लग्नानंतर काही दिवसांनी गैरअर्जदार अर्जदाराला घेवून पुणे येथे गेला व नेहमीप्रमाणे कंपनीमध्ये जात होता. त्यावेळी अर्जदार ही गैरअर्जदाराला म्हणायची

की, एवढ्या पगारामध्ये होत नासून त्यांनी परत सिरसी येथे जावे. त्यावेळी गैरअर्जदार म्हणाला की, तो कंपनी सोडत नाही व त्याच्या कंपनीला पगार वाढ करायला सांगतो, परंतु, पगार वाढ झाली नाही त्यामुळे नाईलाजास्तव गैरअर्जदार अर्जदाराला घेवून सिरसी येथे गेला. त्यानंतर गैरअर्जदार उमरेड येथे एका कंपनीमध्ये सिक्योरिटी गार्ड म्हणून रुजू झाला व अर्जदार ही दिवसभर सिरसी येथे राहायची. अर्जदार ही काही दिवस चांगली राहून गैरअर्जदारास कुटूंबातून वेगळे राहण्याचा तगादा लावला तसेच गैरअर्जदाराच्या आई वडीलासोबत व बहिणीसोबत विनाकारण झगडा भांडण करायची. गैरअर्जदाराने कुटूंबातून वेगळे राहण्यास मनाई केली असता अर्जदाराचे वागणे अजूनच बिघडले. अर्जदार ही घरात कुठलेही काम करीत नव्हती व नेहमी शुल्लक कारणावरुन झगडा भांडण करायची. अर्जदाराच्या अशा वागण्यामुळे गैरअर्जदार अर्जदाराला घेवून उमरेड येथे रुम करुन राहण्यास सुरुवात केली, परंतु, काही महिन्यांनी अर्जदार गर्भवती असल्यामुळे आराम करण्यासाठी सिरसी येथे राहण्यास गेली. त्याच दरम्यान काही दिवसांनी गैरअर्जदाराचे मोठे जावई मरण पावले व त्याच्या मोठ्या बहिणीची जबाबदारी गैरअर्जदारावर आली. त्याच दरम्यान अर्जदाराची प्रसुती झाली व मंथन जन्माला आला. मुलाच्या जन्मापासूनचा सर्व खर्च गैरअर्जदाराच्या घरच्यांनी केला व काही दिवसांनी गैरअर्जदाराच्या लहाण बहिणीचे लग्न झाले व काही दिवसांनी तिचे पती मरण पावले. त्यामुळे गैरअर्जदाराच्या लहाण बहिणीची जबाबदारी आली. त्यादरम्यान अर्जदार व गैरअर्जदाराचा दुसरा मुलगा राज याचा जन्म झाला व त्याचा औषधोपचार त्याच्या जन्मापासूनचा सर्व खर्च गैरअर्जदार यांनी केला. गैरअर्जदार व अर्जदार यांच्यामधे कधीही कोणतेही भांडण झाले नाही. केवळ अर्जदाराच्या भावाच्या हस्तक्षेपामुळे त्यांच्यात वादविवाद झाला व अर्जदाराचा स्वभावात बदल होत गेला.

**४.** गैरअर्जदाराने त्याच्या विशेष कथनात त्याने पुढे असे म्हणणे मांडले की, अर्जदार शिक्षीत आहे व ती उमरेड येथे एका कॉलेजमध्ये जॉब करते व दरमाह रु.१२,०००/- कमवीत आहे. तसेच अर्जदार ही स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास सक्षम आहे व अर्जदार ही स्वतःच्या मर्जीने तिच्या आई वडीलांकडे राहत आहे. अर्जदार ही

मागील सात महिन्यापासून आई वडीलांकडे राहत असल्यामुळे गैरअर्जदाराचे सांसारीक जिवन विस्कळीत झाले आहे. गैरअर्जदार हा सिरसीपासून २० कि.मी. अंतरावर असलेल्या बेला येथील कारखान्यामध्ये सिक्योरिटी गार्ड म्हणून काम करतो त्यामधून त्याला दरमाह रु.९,०००/- मिळतात व त्या पगारामध्ये गैरअर्जदाराला येणे जाणेचा पेट्रोल खर्च तसेच मुलांचा व म्हातारे आई वडीलांचा औषोधपचाराकरिता व जीवन जगण्यासाठी खर्च करावे लागते. गैरअर्जदार हा अर्जदाराला सोबत घेवून जाण्यास तयार आहे. तसेच गैरअर्जदार व त्याच्या कुटुंबियांनी कोणत्याही सदस्यांनी अर्जदारास मानसिक, शारिरिक, आर्थीक त्रास दिलेला नाही. त्याने तिचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**५.** प्रस्तुत प्रकरणात अर्जदाराचे वकील श्री भोंबे व गैरअर्जदार यांचे वकील श्री शास्त्रतराकार यांचा युक्तीवाद केला. प्रस्तुत प्रकरणात अर्जदाराच्या अर्जाचे अवलोकनकरिता तिने विविध घरगुती हिंसाचाराच्या घटनांचा उल्लेख केलेला आहे. त्यामध्ये तिने लग्न झाल्यानंतर अर्जदार हा तिचा शारिरिक व मानसिक छळ करीत होता तसेच, तिला वारंवार मारहाण करीत होता. अशा घटनांचा उल्लेख केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणात कौटुंबिक हिंसाचार अहवाल मागविण्यात आला होता. त्याचे अवलोकनकरिता त्यामध्ये अर्जदाराने नमूद केलेल्या घटनांना पूर्णपणे दुजोरा मिळते. तसेच, त्यामध्ये स्पष्टपणे नमूद केलेले आहे की, गैरअर्जदाराने अर्जदाराला शिवीगाळ केलेली आहे तसेच वारंवार मारहाण केलेली आहे.

**६.** या उलट गैरअर्जदाराचे लेखी बयानाचे अवलोकनकरिता त्याने त्यामध्ये अर्जदाराचा कौंटुबिक हिंसाचारासंदर्भात संपूर्ण मजकूर नाकारला आहे. त्यामध्ये त्याने असे कथन केले की, अर्जदार ही छोट्या छोट्या कारणांवरुन त्याच्याशी वाद करीत होती. ती गैरअर्जदारास कुटूंबातून वेगळे राहण्याचा तगादा लावत होती तसेच गैरअर्जदाराच्या आई वडीलासोबत व बहिणीसोबत विनाकारण झगडा भांडण करायची. गैरअर्जदाराने कुटूंबातून वेगळे राहण्यास मनाई केली असता अर्जदाराचे वागणे अजूनच

बिघडले. अर्जदार ही घरात कुठलेही काम करीत नव्हती व नेहमी शुल्लक कारणावरुन झगडा भांडण करायची. गैरअर्जदार व अर्जदार यांच्यामधे कधीही कोणतेही भांडण झाले नाही. केवळ अर्जदाराच्या भावाच्या हस्तक्षेपामुळे त्यांच्यात वादविवाद झाला व अर्जदाराचा स्वभावात बदल होत गेला. माझ्या मते, अर्जातील नमूद घटनांनुसार हे प्रथनदर्शिनी दिसून येते की, अर्जदारावर कौटूंबिक हिंसाचार झाला आहे. त्यामुळे माझ्या मते, वरील सर्व बाबींचा विचारकरिता अर्जदाराच्या कथनाला कौटुंबिक हिंसाचार अहवाल दुजोरा देत असल्यामुळे प्रथमदर्शनी अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार झाला हे दिसून येते.

**७.** प्रस्तुत प्रकरणात अर्जदाराने व गैरअर्जदाराने त्यांचे संपत्ती व दायीत्व [assets and liabilities] अहवाल दाखल केलेले आहेत. अर्जदाराने तिचा संपत्ती व दायीत्व अहवाल नि.क्र.११ वर सादर केला. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार ती सद्यस्थितीत तिच्या माहेरी राहत आहे व तिचा महिना औषोधोपचार व राहण्याचा खर्च एकूण रु.१०,०००/- येते. तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. याउलट गैरअर्जदार हा सुपरवाइजरची नोकरी करतो व त्याला महिना रु.५०,०००/- मिळतो, तसेच, शेती मधून वर्षाला रु.२,००,०००/- उत्पन्न मिळते. अर्जदाराने तिच्या अहवालासोबत गैरअर्जदार महिना रु.२५,०००/- कमवितो या संदर्भात कुठलाही इतर कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. तसेच गैरअर्जदाराने त्याचा अहवाल नि.क्र.१२ वर दाखल केला आहे. त्यानुसार तो बारावी शिकलेला आहे व सिक्युरिटी गार्ड म्हणून काम करतो व त्याला महिना रु.९,०००/- मिळतो. तसेच, त्याचा मासीक खर्च एकूण रु.३,०००/- असतो.

८. प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदाराने महिना रु.१०,०००/- पोटगीची मागणी केलेली आहे. जरी अर्जदाराने गैरअर्जदार हा महिना रु.२५,०००/- कमवितो या संदर्भात कुठलाही कागदोपत्री पुरावा दिला नसला तरी अर्जदाराच्या म्हणण्यानुसार तो खाजगी कंपनीत नोकरी करतो. सदरची बाब ही गैरअर्जदाराने त्याच्या नि.क्र.१२ मधील अहवालामध्ये मान्य केली आहे, परंतु, त्याने असे म्हणणे मांडले की, तो केवळ महिना रु.९,०००/- कमवितो. या बाबीवरुन हे स्पष्ट दिसून येते की, गैरअर्जदार हा धडधाकड

आहे व खाजगी कंपनीत नोकरी करतो. तसेच, अर्जदाराच्या म्हणण्यानुसार तिच्या व्यतिरिक्त गैरअर्जदारावर कोणीही अवलंबून नाही. गैरअर्जदाराच्या म्हणण्यानुसार त्याच्यावर त्याच्या वयोवृद्ध आई-वडीलांची जबाबदारी आहे. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचारकरिता माझ्या मते, अर्जदार सद्यपरिस्थितीत तिच्या आई वडीलांकडे राहत आहे. गैरअर्जदाराने केलेल्या कौटुंबिक हिंसाचाराने तिला माहेरी राहणे भाग पडले आहे. गैरअर्जदार हा धडधाकड व नोकरी करतो. अशा परिस्थितीत गैरअर्जदाराकडून अर्जदाराला महिना रु.३,०००/- पोटगी देणे योग्य होईल. त्याकरिता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज अंशतः मान्य करण्यात येतो.

२. गैरअर्जदाराने अर्जदार हिच्यासोबत त्याचे मार्फत किंवा त्याचे नातेवाईकांमार्फत कोणत्याही प्रकारे कौटुंबिक हिंसाचार करु नये.

२. गैरअर्जदाराने अर्जदाराला दरमहा रक्कम रु.३,०००/– (अक्षरी तीन हजार रुपये फक्त) महिना पोटगी म्हणून सदर अर्ज दाखल तारखेपासून अर्जाचा अंतीम निकाल लागेपर्यंत देण्याचे आदेशित करण्यात येते.

LAD SURAJ JANARDAN
Digitally signed by LAD SURAJ JANARDAN
Date: 2026.03.11 15:34:32 +0530

भिवापूर.
दिनांक - १०.०३.२०२६

(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.

*******

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. File of judgment/order are word to word as per original judgment/order.

Name of Stenographer : K. S. Kathane
to C.J.J.D. & J.M.F.C., Bhiwapur.